**सीएनआर : एमएचआरजी०७—००१२२०—२०२०**

**<u>नियमित फौजदारी खटला क्र.१९५/२०२० मधील निशाणी नि.११ व १६ वरील एकत्रित आदेश</u>**

१. यातील अर्जदार यांचे मालकीचे विवो कंपनीचा मॉडेल नं. १९०२ मोबाईल व सॅमसंग गॅलक्सी कंपनीचा मॉडेल नं.ए.९ मोबाईल हा मुद्देमाल कर्जत गु.र.नं.१८३/२०२० चे कामी जप्त केला आहे. त्यामुळे अर्जदारांनी सदर जप्त मुद्देमाल परत मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे.

२. सरकारी वकीलांनी त्यांचे म्हणणे देवून जप्त करण्यात आलेला मोबाईल हा तपासादरम्यान जप्त करण्यात आलेला आहे. सबब, सदयस्थितीत तो अर्जदारास परत केल्यास त्याचे स्वरुप बदलण्याची किंवा अशाच प्रकारच्या गुन्हयाकरिता वापरण्याची शक्यता नाकारत येत नाही. सबब, सदयपरिस्थितीत अर्ज मंजूर होणे योग्य व न्यायोचित होणार नसल्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

३. अर्जदारांनी अर्जासोबत शपथपत्र दाखल केल्याने त्यांच्या कथनाला पुष्टी मिळते. सदर जप्त मुद्देमालाच्या खरेदीची पावती, अर्जदारांच्या आधार कार्डाची पडताळलेली प्रत इ. कागद नि.१४/ड च्या यादीसोबत दाखल केले आहेत. त्यावरुन अर्जदाराची ओळख पटते व जप्त मुद्देमाल त्यांच्या मालकीचा असल्याचे दिसून येते.

४. याकामी आरोपी प्रकाश कडून विवो कंपनीचा १९०२ मोबाईल संच व आरोपी योगेश कडून सॅमसंग गॅलक्सी कंपनीचा मॉडेल नं.ए.९ मोबाईल संच तपासी अधिका-यांनी जप्त केला आहे. दोषारोपपत्रामध्ये तपासी अधिका-यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे की, आरोपी प्रकाश हा इतर आरोपींसोबत मटका खेळत व खेळवीत असताना मिळून आला व सदर मटक्याचे आकडे व रक्कमेचे आकडे

आरोपी योगेश याला मोबाईलवरुन व्हॉटसॲप या सोशल मिडियाचा वापर करुन देत असताना मिळून आला. त्याप्रमाणे तपासी अधिका-यांनी कागदपत्रांची यादीतील अनुक्रमांक १९ खाली मोबाईलचे फोटो आणि स्क्रीन शॉट दाखल केलेले आहे. या स्क्रीन शॉटवरुन आकडयांची व रक्कमेची देवाणघेवाण झाल्याचे दिसून येत आहे. निश्चितच, सदरचे स्क्रीन शॉटचा स्त्रोत हा दोन्ही आरोपींच्या मोबाईल संचांमध्ये आहे. त्यामुळे सदरचे मोबाईल संच आरोपींना परत केल्यास त्यामधील व्हॉटस ॲप या सोशल मिडीयावरील माहिती डिलीट करण्याचा अथवा त्यात फेरबदल करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या प्रकरणातील महत्वाचा पुरावा आरोपी नष्ट करु शकतात.

५. तपासी अधिका-यांनी आरोपींविरुध्द भारतीय जुगार कायदयाव्यतिरिक्त माहिती तंत्रज्ञान अधिनियम ६६(ड) अन्वये दोषारोपपत्र दाखल केले आहे. सदरचा गुन्हा शाबीत करण्यासाठी जप्त केलेले मोबाईल संच हे महत्वाचा पुरावा आहे. असा पुरावा आरोपी त्यांच्या लाभामध्ये नष्ट करुन सरकारीपक्षाच्या कथनांना हानी पोहचवू शकतात. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत सदरचा मुद्देमाल आरोपींना परत करणे योग्य व न्यायोचित होणार नाही. करिता खालील आदेश –

## आदेश

अर्ज (नि.११ व १६) नामंजूर.

Digitally signed by Shraddha Jitendra Dolare
Date: 2021.03.04 15:59:42 +05'30'

कर्जत
तारीख : ०१/०३/२०२१

(श्र.जि. डोलारे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत
जिल्हा रायगड.